**नि.फौ.खटला क्र.२०२/२०१७**
**नि. क्र.३९**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ३**
देवाशपथ खरे सांगतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | - | हरीभाऊ गोविंद केवाळ |
| माझे वय | - | ६० वर्षे व्यवसाय - शेती |
| राहणार | - | वडगाव आनंद, ता. जुन्नर, जि. पुणे. |

**<u>सरतपास - सहा. सरकारी वकिल श्री.ए.एल.लखोटिया</u>**

१. प्रदीप जाधव व सोनाली जाधव यांनी रजिस्टर लग्न केले आणि ते पिंपरीपेंढार या गावी येवून शेती करत होते. प्रदीप आणि सोनाली यांच्यामध्ये वाद झाला त्यामुळे प्रदीप सोनालीला सांभाळत नव्हता. श्रेया हॉस्पीटल, आळेफाटा येथे सोनाली डिलीवरीसाठी अडमीट झाली होती. त्यावेळी मी दवाखान्यात गेलो होतो. दवाखान्याचा खर्च निम्मा प्रदीपने व निम्मा आम्ही दिला होता. आम्ही प्रदीप व सोनालीला डिस्चार्ज दिल्यावर कुठे जायचे आहे हे ठरवा असे म्हटल्यावर ते काहीच म्हणाले नाही. डिस्चार्ज दिल्यानंतर आम्ही ४-५ दिवसाकरीता सोनालीला घरी घेवून गेलो. ४-५ दिवसानंतर सोनाली व तिच्या बाळाला घेवून जाण्यासाठी प्रदीप आला नाही. आम्ही खूप समजावण्याचा प्रयत्न केला परंतु प्रदीप आला नाही. आम्ही प्रदीपच्या आई वडिलांना सांगितले परंतु त्यांनी ते मनावर घेतले नाही. त्यामुळे सोनाली व तिच्या बाळाला सांभाळण्याची वेळ आमचेवर आली.

२. सोनालीची मुलगी मोठी झाल्याने ती तिच्या मुलीसह वेगळी राहू लागली. सोनालीने मला प्रदीप तिला सांभाळत नसल्याचे सांगितले व या व्यतिरिक्त काही सांगितले नाही. मी प्रदीपला पाहिले असता ओळखू शकतो. तो आज न्यायालयात हजर नाही. नि.क्र.३८ प्रमाणे गैरहजेरी माफीचा अर्ज मंजूर.

सरतपास पुर्ण.

## उलटतपास - आरोपीतर्फे वकिल श्री.आर.बी.नायकोडी

३. हे म्हणणे खरे आहे की, मी, सोनाली व माझी पत्नी आज न्यायालयात एकत्र आलो आहोत व येताना आमच्यात या प्रकरणाबद्दल चर्चा झाली. हे म्हणणे खरे आहे की, सोनालीने मला उत्तरे कशी द्यायची हे सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, सोनाली व प्रदीपचे लग्न आम्हाला मान्य नव्हते, आमच्या सर्वांचा लग्नाला विरोध होता. हे म्हणणे खरे आहे की, सोनालीचे लग्न झाल्यानंतर सोनाली माझ्याकडे कोणतेही गा-हाणे घेवून आली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सोनाली लग्न झाल्यापासून पिंपरीपेंढार येथे प्रदीप सोबत सुखी राहत होती. हे म्हणणे खरे नाही की, प्रदीप व सोनाली यांच्या शेतात टोमॅटोच्या पिकामधून चांगले उत्पन्न मिळत होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रदीपचे आईवडील आमच्या घराशेजारी राहायला आहे.

४. मी व माझा भाऊ ढवळेराम केवाळ नेताजी डोके यांचेकडे गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, नेताजी डोके यांनी प्रदीपच्या आईवडीलांना दमदाटी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, प्रदीप व सोनालीचे लग्न आम्हाला मान्य नसल्याने सोनालीच्या डिलीवरीनंतर आम्ही सोनालीला प्रदीपकडे पाठवले नाही. हे म्हणणे खरे नाही की, डिलीवरी झालेनंतर प्रदीप सोनालीला घेवून जाण्यासाठी आला होता परंतू मी सोनालीला प्रदीपसोबत पाठविले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रदीपला सोनालीला नांदवण्याची इच्छा असताना देखील तुम्ही सोनालीला प्रदीपकडे नांदू दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सोनालीवर दबाव आणून खोटी केस करण्यासा सांगितली. हे म्हणणे खरे नाही की, प्रदीप सोनालीला सांभाळत नसल्याचे सोनालीने मला कधीही सांगितले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रदीप सोनालीला नेण्यास आला नाही हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रदीप सोनाली यांच्यामध्ये कधीही वाद झाला नाही, माझ्या हट्टासाठी

सोनाली माझ्याकडे राहिली. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात प्रदीपविरुध्द सांगितलेला सर्व मजकूर खोटा आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

समक्ष
श्रवणोत्तर स्वीकृती,

NAMRATA MAHADEV BIRADAR
Digitally signed by NAMRATA MAHADEV BIRADAR
Date: 2026.08.12 17:57:40 +0530

स्थळ - जुन्नर
दि.१२/०८/२०२५

( नम्रता म. बिरादार)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
जुन्नर, जिल्हा पुणे.